## अपघातग्रस्त कारमधून ४०० किलो गोवंशाचे मांस जप्त; एकाला अटक



सविस्तर वृत्त पान ४ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–48 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 3 ऑगस्ट 2026 ■ किंमत 2 रुपये, पाने –4

## रखडलेली विकासकामे आता मार्गी लागणार?

# ग्रामीण विकासासाठी प्रभावी नियोजनाची गरज; १६व्या वित्त आयोगातून विकास कामांना गती : अविनाश गलांडे

## ग्रामस्वराज अभियानांतर्गत जिल्हा परिषद सदस्यांना विकास आराखड्याचे प्रशिक्षण

**दिनेश परदेशी/छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत विशेष प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर व यशदा, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (आरजीएसए) अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा (G$PDP/BPDP/DPDP) सन २०२६–२७ या विषयावरील जिल्हा परिषद सदस्यांचे एकदिवसीय प्रशिक्षण भानुदास हॉल येथे उत्साहात पार पडले.

कार्यक्रमात जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांनी सांगितले की, केंद्र पुरस्कृत १५व्या वित्त आयोगाचा कालावधी पूर्ण झाला असून आता १६व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावरील विकास आराखडे अधिक प्रभावीपणे तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. यशदाच्या मास्टर ट्रेनर्सनी विकास आराखडा तयार करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, पाणीपुरवठा, स्वच्छता, मूलभूत सुविधा आणि इतर विकास कामांसाठी वित्त आयोगाच्या निधीचे ५० टक्के बंधित व ५० टक्के अबंधित निधीचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या




आहेत. ग्रामपंचायतींकडून तयार होणारे आराखडे पंचायत समितीच्या शिफारशीनंतर जिल्हा परिषद स्तरावर अंतिम करून सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर १६व्या वित्त आयोगांतर्गत विविध विकासकामांना गती दिली जाईल. गलांडे यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण भागात शाळा, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना अशा अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर काम ाची आवश्यकता आहे. चार वर्षे प्रशासकीय कारभार असल्यामुळे अनेक विकासकामे रखडली असून आता लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सर्व क्षेत्रांमध्ये दर्जेदार विकास घडवून आणण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहील. ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद या सर्व स्तरांवर समन्वयातून प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.






यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल यांनी अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना सांगितले की, जिल्हा परिषदेतील सर्व ६३ सदस्यांना विश्वासात घेऊन विकासाचे नियोजन करण्यात येत आहे. पक्षभेद न करता सर्वांना सोबत घेऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यशदामार्फत सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शिबिरांमुळे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना त्यांच्या कार्यकाळात प्रभावीपणे काम करण्यासाठी मार्गदर्शन मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. माध्यमांनी विकासकामांना सातत्याने प्रसिद्धी दिल्याबद्दल त्यांनी आभारही व्यक्त केले.









## प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष गावपातळीवर करणे आवश्यक – बालाजी सोनटक्के



समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी आपल्या मनोगतात लोकप्रतिनिधींनी प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष गावपातळीवर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा, विशेषतः महिलांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. बचत गट, सामाजिक संस्था आणि विविध माध्यमांतून महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामात सहभागी करून घेतल्यास ग्रामविकासाला अधिक चालना मिळेल, असे ते म्हणाले. १५ ऑगस्टच्या ग्रामसभांपासून प्रभावी नियोजनाला सुरुवात करून प्रत्येक गावाच्या विकासासाठी लोकसहभाग वाढविण्याचे आवाहनही त्यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात ग्रामपंचायत विकास आराखडा प्रभावीपणे तयार करणे, १६व्या वित्त आयोगाच्या निधीचे नियोजन, ग्रामीण विकासासाठी लोकसहभाग वाढविणे आणि गावपातळीवरील विकासकामांना गती देण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांचा राजीनामा, पदोन्नतीच्या नाराजीतून राजीनामा दिल्याची चर्चा, तक्रारींची चौकशी सुरु झाल्याची माहिती

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांचा राजीनामा राज्याचे मुख्य सचिवांना मिळाला आहे. मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांचा राजीनामा राज्याचे मुख्य सचिव यांना मिळाल्यानंतर सचिवांकडून पुढील प्रक्रियेला सुरुवात करण्याच आल्याची माहिती मिळत आहे. अतुल चव्हाण यांच्याबाबत लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारींची चौकशी सुरू झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

अतुल चव्हाण हे भाजप आमदार अनुराधा चव्हाण यांचे पती आहेत. पदोन्नतीच्या नाराजीतून राजीनामा दिल्याची चर्चा असली तरी त्यांना अपेक्षित पदन्नोतीत इतर ही अधिकारी असल्याने त्यांना आताच मिळणे शक्य नसल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागातील विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. अतुल चव्हाण यांच्याबाबत लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारींची चौकशी सुरू झाल्याची माहिती आहे.

**चार वर्षे आधीच त्यांनी राजीनामा दिला** – अतुल चव्हाण यांच्या पत्नी अनुराधा चव्हाण या फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदार आहेत.

एकाच कुटुंबात राजकारण आणि प्रशासनातील महत्त्वाची पदे असल्याने काहींनी शासनाकडे त्यांच्याविरोधात तक्रारी केल्याची चर्चा आहे. या राजकीय घडामोडींनंतर शासनाने २२ जून रोजी चव्हाण यांची नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी (मुंबई) येथे मुख्य अभियंता म्हणून बदली केली होती आणि त्यांना ३१ जुलै रोजी तेथे रुजू होण्याचे आदेश देण्यात आले होते. सचिवपदाच्या पदोन्नतीसाठी पात्र असल्याने त्यांना संधी मिळेल अशी अपेक्षा होती. पदोन्नतीची फाईल शासनदरबारी सादरही झाली होती; मात्र ३१ जुलैच्या सायंकाळपर्यंत त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. पात्र अधिकाऱ्यांना डावलून इतरांना संधी दिली जात असल्याच्या नाराजीतून चव्हाण यांनी ३२ वर्षांची सेवा थांबवण्याचा निर्णय घेतला. शासकीय नियम ानुसार ते मार्च २०३० मध्ये सेवानेवृत्त होणार होते, मात्र चार वर्षे आधीच त्यांनी राजीनामा दिला. अतुल चव्हाण यांनी १६ ऑगस्ट १९९४ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत शासकीय सेवा बजावली.



# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# जितो लेडीज विंगतर्फे 'उडान - लाइफस्टाईल एक्झिबिशन'चे ५ व ६ ऑगस्टला भव्य आयोजन

## राखी-तीज स्पेशल प्रदर्शनात देशभरातील ७५ हून अधिक नामांकित प्रदर्शकांचा सहभाग; महिला सक्षमीकरणालाही प्राधान्य




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जितो लेडीज विंग, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने 'डान - लाइफस्टाईल एक्झिबिशन' (राखी व तीज स्पेशल एडिशन-४) चे भव्य आयोजन ५ व ६ ऑगस्ट २०२६ रोजी जालना रोडवरील हॉटेल अतिथी येथे करण्यात आले आहे. या दोन दिवसीय प्रदर्शनात फॅशन, लाइफस्टाईल, गृहसजावट आणि सणासुदीच्या खरेदीची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर महिला पदाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य कन्व्हेनर सौ. डिम्पल पगारिया यांच्या हस्ते होणार आहे. जितो लेडीज 'उडान'चे हे चौथे पर्व असून यंदा कोलकाता, दिल्ली, मुंबई, इंदूर, रायपूरसह देशातील विविध शहरांतील ७५ हून अधिक नामांकित प्रदर्शक सहभागी होत आहेत. महिला सक्षमीकरणाचा सामाजिक उद्देश लक्षात घेऊन साधार्मिक महिलांसाठी स्टॉल्स प्रायोजित करण्यात आले असून, त्यांना व्यवसाय वाढीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रदर्शनामध्ये फॅशन ज्वेलरी, डिझायनर साड्या, एथनिक व वेस्टर्न वेअर, किड्स वेअर, पर्सेस, गिफ्ट हॅम्पर्स, होम डेकोर, गृहउपयोगी वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, लाइफस्टाईल प्रॉडक्ट्स, राखी व तीज स्पेशल कलेक्शन तसेच विविध गृहउद्योगांच्या आकर्षक वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

या उपक्रमाचे इव्हेंट हेड म्हणून डॉ. प्रियांका संघवी आणि सारिका सेठी कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आयोजनाची जबाबदारी पार पाडली जात आहे. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनल जैन, प्रीती बाकलीवाल, रुतु जैन, सपना मुथियान, प्रभा पगारिया, रश्मी जैन, अनुजा जैन, नीता सेठिया, सुरुची मुगदिया, रश्मी झाबड, स्मृती सिंधी यांच्यासह जितो लेडीज विंगच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

याशिवाय जितो चॅप्टरचे अध्यक्ष अनिल संचेती, आशीष सकलेचा, रवींद्र खिवसरा तसेच विविध चॅप्टर्सचे पदाधिकारी, प्रायोजक, उद्योजक आणि स्वयंसेवक यांच्या सहकार्यामुळे हा म होत्सव अधिक भव्य स्वरूपात साकारला आहे. रक्षाबंधन आणि तीज या सणांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या प्रदर्शनाला शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे विचार म्हणजे समतेची प्रेरणा देणारे- सभापती बालाजी सोनटक्के

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचार प्रबोधिनी आणि सकल चर्मकार समाज, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमात मान्यवरांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि सामाजिक कार्याचा गौरव करत, त्यांनी वंचित, शोषित, दलित, भटके-विमुक्त, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना आपल्या लेखणीतून आवाज दिल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांतून समता, बंधुता, श्रमाला प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचा संदेश मिळतो, जो आजही समाजाला प्रेरणा देणारा असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे शुभेच्छुक तथा माजी सहाय्यक पोलीस आयुक्त आणि जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर समाजकल्याण विभागाचे सभापती बालाजी सोनटक्के यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्यनिर्मिती नसून सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. त्यांच्या विचारांमधून समता, बंधुता आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा मिळते. त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आजच्या समाजाची जबाबदारी आहे. याप्रसंगी जीवन दुर्वे, सुभाष धनतोले, विशाल बन्सवाल, अशोक बन्सवाल, संजय बाविस्कर, प्रवीण बोर्डे, महादेव डांबरे, माधव दासरे, ब्रिजलाल बन्सवाल यांच्यासह सकल चर्मकार समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या विचारांचा अंगीकार करून ते समाजात अधिक व्यापकपणे रुजविण्याचा निर्धार व्यक्त केला.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' उत्साहात संपन्न

# राज्याच्या विकासाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची नवी दिशा : किशोर आबा पवार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत माजी उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील रूख्मिणी लॉन्स, हतनूर (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी किशोर आबा पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर किशोर आबा पवार यांनी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात राबविण्यात आलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. शेतकरी कर्जमाफी, सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी घेतलेले निर्णय तसेच विविध समाजघटकांना आरक्षण देण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनहितासाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा आढावा घेत त्यांच्या नेतृत्वामुळे विकासाला नवी दिशा मिळाल्याचे किशोर आबा पवार यांनी सांगितले.

या कार्यक्रमास कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. संजनाताई जाधव, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. संजयभाऊ खंबायते, उपविभागीय अधिकारी श्री. संजयजी गोरड, तहसीलदार सौ. सारिका भगत, पंचायत समितीच्या उपसभापती सौ. मायाताई सुराशे, डॉ. दिलीपसिंग राजपूत, पंचायत समिती सदस्य श्री. संतोषजी करवंदे तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात महसूल विभागामार्फत विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली असून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# अँटी नार्कोटिक्स स्क्वॉड व गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई; एमडी ड्रग्जसह एक जण अटकेत

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



अँटी नार्कोटिक्स स्क्वॉड आणि गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत जटवाडा परिसरातून मेफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका संशयिताला अटक करण्यात आली. या कारवाईत १२ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) पावडर जप्त करण्यात आली असून तिची अंदाजे किंमत २ लाख ४० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.


३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.२० वाजण्याच्या सुमारास प्लॉट क्रमांक २४, नवाब मस्जिदजवळ, सईदा कॉलनी, जटवाडा येथे ही कारवाई करण्यात आली. यावेळी आदिल चाऊस अहमद चाऊस (वय ३५, रा. सईदा कॉलनी, जटवाडा, छत्रपती संभाजीनगर) याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून १९ प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये ठेवलेली १२ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) सदृश पांढऱ्या रंगाची पावडर जप्त करण्यात आली. जप्त अंमली पदार्थाची अंदाजे किंमत २ लाख ४० हजार रुपये आहे. या प्रकरणी अँटी नार्कोटिक्स स्क्वॉडचे पोलीस अंमलदार सरताज उस्मान पठाण यांच्या फिर्यादीवरून बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २२९/२०२६ अंतर्गत एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २१(अ) व २९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात आरोपी आर्थिक फायद्यासाठी मेफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाची बेकायदेशीर विक्री करत असल्याचे समोर आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक यादव करीत आहेत.

# परिवर्तनवादी कार्याला अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने लोकशाहीर साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व परिवर्तनवादी कार्याला अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास राजू खाजेकर, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र सिरसागर , विजय कसारे, समाधान वाणी, संस्थेचे अध्यक्ष रामदास गायकवाड, दिपक सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी वर्गाला न्याय व स्वाभिमानाची प्रेरणा दिली असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे



ही आजच्या पिढीची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुसरण करून समाजप्रबोधनासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# 'विद्यार्थ्यांचे यश हीच गुरुंना खरी गुरुदक्षिणा'; ढोरेगाव जिल्हा परिषद शाळेचा अभिनव उपक्रम राज्यभर ठरतोय चर्चेचा विषय

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगाव येथे 'विद्यार्थ्यांचे यश हीच गुरुंना खरी गुरुदक्षिणा' हा प्रेरणादायी संदेश प्रत्यक्ष कृतीतून साकारण्यात आला. इयत्ता पाचवी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पूजन व सत्कार करून शिक्षकांचा खरा सन्मान विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत असल्याचा अनोखा संदेश देण्यात आला. याचवेळी इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना नवीन गणवेशांचे वितरण करण्यात आले.

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल, केंद्रप्रमुख राजेश हिवाळे, तसेच गणपत कांबळे, शंकर कांबळे, नारायण मोरे, ताराचंद कांबळे, अहमद शेख, प्रदीप कांबळे आणि मनावर शेख यांच्या हस्ते शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे विधिवत पूजन व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव म्हणजे शिक्षकांच्या कार्याचा सर्वोच्च सन्मान असल्याची भावना या अभिनव उपक्रमातून प्रभावीपणे व्यक्त करण्यात आली.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, परिश्रम, सातत्य आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून देत मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची प्रेरणा देतानाच सामाजिक जबाबदारीची



जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना नवीन गणवेशांचे वितरण करण्यात आले. नवीन गणवेश परिधान केलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, आत्मविश्वास आणि उत्साहाने संपूर्ण शाळा परिसर भारावून गेला. प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा शाळेचा निर्धार या उपक्रमातून अधोरेखित झाला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्रप्रमुख राजेश हिवाळे, पदवीधर शिक्षक मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मनोज मस्के, नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे, सचिन पाटसकर, शामीर शेख, अली बाकोदा आणि कल्याणी जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि सर्व विद्यार्थ्यांना नूतन गणवेश वितरणाचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम जिल्हा परिषद शाळांमधील नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग म्हणून पुढे आला असून, शिक्षण क्षेत्रात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. 'गुरूंचे संस्कार, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शिक्षणाची समान संधी यांच्याच बळावर उज्ज्वल भविष्य घडते,' हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

# जिल्हा परिषद पशुसंवर्धन समितीची मासिक बैठक; पशुवैद्यकीय सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय समितीची मासिक बैठक गुरुवारी (दि. ३१ जुलै) दुपारी १२ वाजता जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा समितीचे सभापती जितेंद्र जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या विविध कामांचा आढावा घेण्यात आला तसेच जनावरांच्या आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. बैठकीस समिती सदस्य पांडुरंग ओटे, राधाकृष्ण काकडे, अनिता बनकर, वंदना शिंदे, लंकाबाई जाधव तसेच पदसिद्ध सचिव नानासाहेब कदम उपस्थित होते. यावेळी सभापती जितेंद्र जैस्वाल यांनी पशुसंवर्धन विभागाला विविध बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. गायींमधील वंध्यत्वाच्या समस्येवर ठोस उपाययोजना राबविणे, पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये वेळापत्रकानुसार सेवा सुरू असल्याची नियमित तपासणी करणे, ग्रामपंचायत स्तरावर दवाखान्यांच्या वेळापत्रकाचे माहितीफलक लावणे, दवाखान्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रयत्न करणे तसेच दवाखान्यांच्या जागेवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय ज्या गावांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध नाहीत, मात्र पशुधनाची संख्या अधिक आहे, अशा ठिकाणी विशेष सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. बैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता आणि ग्रामीण भागातील पशुपालकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत अभिवादन!



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी आंदोलक,नामवंत साहित्यिक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेमध्ये अभिवादन करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष माननीय जितेंद्र जयस्वाल यांनी अध्यक्षीय समारोपात अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर समाजाने चालले पाहिजे,समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आयुष्यभर अण्णा भाऊंनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेचा पुरस्कार करत अण्णाभाऊंचे कार्यकर्तृत्व आणि त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला तर समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी बोलताना त्यांनी आपल्या हयातीत 'आहे रे आणि नाही रे' वर्गामध्ये जोपर्यंत समानता येत नाही; तोपर्यंत समाज सुधारणार नाही हे त्यांनी हेरल्यामुळे आयुष्यभर आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यम ातून समाज प्रबोधनाचे काम केले असल्याचे विशद केले.

यावेळी समाज कल्याण विभागाचे विस्तार अधिकारी विजेंद्र डकले, देविदास बिरारे, बबन अरसुळ, शांत पाटील, कल्पना ढाकणे,संजय वाघ, कल्याण ढोरकुले, जनार्दन चव्हाण, विनोद शेळके यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगीता साळुंके –गायकवाड यांनी केले.

# ९ ऑगस्टपासून क्रांती चौकात बेमुदत उपोषणावर मराठा क्रांती मोर्चा ठाम

छत्रपती संभाजीनगर : मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे व शाश्वत आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी येत्या ९ ऑगस्टपासून क्रांती चौकात बेमुदत उपोषण करण्याच्या निर्णयावर मराठा क्रांती मोर्चाने रविवारी पुन्हा शिक्कामोर्तब केले. सिडकोतील एन-३ येथील शिवछत्रपती महाविद्यालयात झालेल्या बैठकीत परवानगी मिळो अथवा न मिळो, नियोजित तारखेपासून आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार समाजबांधवांनी व्यक्त केला. तसेच मराठवाड्यात हैद्राबाद गॅझेटियर लागू आहे की नाही, याबाबत राज्य सरकारने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली.

उपोषणासाठी प्रशासनाकडे १५ दिवसांपूर्वीच परवानगी मागण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. गेल्या महिनाभरापासून जिल्ह्यातील गावोगावी दौरे व बैठका घेऊन आंदोलनाची तयारी सुरू असल्याचेही सांगण्यात आले. बैठकीत सध्या लागू असलेल्या एसईबीसी आरक्षणाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक भूमिका घेत नसल्याने हे आरक्षण टिकणार नाही, असा दावा करण्यात आला. गायकवाड आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने प्रलंबित क्युरेटिव्ह याचिकेतील त्रुटी दूर करून राज्य सरकारने आवश्यक पावले तातडीने उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली.

हैद्राबाद गॅझेटियरच्या नोंदीच्या आधारे काढण्यात आलेल्या २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयामुळे समाजात संभ्रम निर्माण झाल्याचा आरोपही बैठकीत करण्यात आला. या निर्णयानुसार अर्ज केलेल्या अनेकांना नोंदी व वंशावळ जुळत नसल्याच्या कारणावरून जातप्रम ाणपत्र नाकारण्यात आल्याने शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा दावा करण्यात आला.दरम्यान, ९ ऑगस्टपासूनच्या बेमुदत उपोषणासाठी क्रांती चौकात परवानगी मिळावी, यासाठी सोम वारी मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी पोलीस आयुक्तांची भेट घेणार असल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली.

मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व संघटनात्मक प्रश्नांवरही बैठकीत चर्चा झाली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा व्याज परतावा दरमहा द्यावा. सारथी संस्थेच्या प्रलंबित योजनांबाबत निर्णय घ्यावा, आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, आत्महत्या केलेल्या शेतकरी व मराठा कुटुंबांना आर्थिक मदत आणि कुटुंबातील एका सदस्याला स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरी द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

# अपघातग्रस्त कारमधून ४०० किलो गोवंशाचे मांस जप्त; एकाला अटक



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पानचक्की गेटजवळ अपघातग्रस्त कारमधून सुमारे ४०० किलो गोवंशाचे मांस जप्त करण्यात आले असून, या प्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. या कारची किंमत सुमारे १.५० लाख रुपये, तर जप्त मांसाची किंमत १.२० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**बेगमपुरा पोलिसांची कारवाई**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास डायल-११२ नियंत्रण कक्षाला पानचक्की गेट परिसरात एका कारचा अपघात झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर डायल-११२ पथकातील पोलीस अंमलदार कमलेश काजळे व रविकुमार कांगणे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तेथे एमएच ०२ एपी ६७५८ क्रमांकाची होंडा झेडएक्स कार लोखंडी खांबाला धडकलेल्या अवस्थेत आढळली. कारची तपासणी केली असता, डिक्कीत सुमारे ४०० किलो गोवंश जातीच्या जनावराचे मांस आढळून आले.

यावेळी कारमध्ये समीर दस्तगीर मदारी (वय २०, रा. देवगाव रंगारी, ता. कन्नड) हा आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून, त्याचा एक साथीदार घटनास्थळावरून पसार झाला आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार कमलेश काजळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक २२८/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमातील कलम ५, ५अ, ५ब, ५क, ९ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२५ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात वापरण्यात आलेली कार व गोवंशाचे मांस जप्त करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मारोती मदेवाड करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) पंकज अतुलकर (भा.पो. से.) आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, पोलीस अंमलदार कमलेश काजळे व रविकुमार कांगणे यांनी केली.

# एमआयडीसीच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) छत्रपती संभाजीनगर परिमंडळात एमआयडीसीच्या ६४ व्या वर्धापनदिनानिमित्त संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे शनिवारी सकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता तथा छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे प्रमुख राहुल बनसोड होते. यावेळी सहमुख्य लेखाधिकारी वैशाली कोकरे, प्रादेशिक अभियंता अमित भामरे, अधीक्षक अभियंता रमेशचंद्र गिरी, कार्यकारी अभियंता (वि.व.सं.) नागराज गोंडे, तसेच एमआयडीसी अधिकारी-कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी एस. एल. श्रीखंडे, प्रशांत भराटे, आर. डी. शिरसे आणि वाय. एम. पळणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एमआयडीसीच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला. औद्योगिक विकासासाठी एमआयडीसीने दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी औद्योगिक प्रगतीसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. वर्धापनदिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य व कलाविष्कारातून उपस्थितांची मने जिंकत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास एमआयडीसीचे अधिकारी, कर्मचारी, पालक, विद्यार्थी तसेच मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले

# श्री दत्त दिगंबर पीठात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



छत्रपती संभाजीनगर : तालुक्यातील लाडगाव येथील श्री दत्त दिगंबर पीठात बुधवारी गुरुपौर्णिमेनिमित्त अभिषेक, दत्तयाग, पुरस्कार वितरण आणि म हाप्रसादाचा अश्या विवीध धार्मिक कार्यक्रम ांनी कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी श्री दत्तात्रेयांचा अभिषेक व दत्तयागाने झाली. दुपारी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यास स. सो. खंडाळकर, सोपानराव मुंडलिक, डॉ. शंकरराव धपाटे, मधुकरराव टाक, नगरसेवक मयूर वंजारी, नारायण अण्णा सुरगोणीवार तसेच राहुल दहिवाल व भक्तपरिवार उपस्थित होते. यावेळी दैनिक पुढारीचे विनोद काकडे यांना 'उत्कृष्ट पत्रकार', वे. शा. सं. विनायक मोहनराव फुलंबरीकर यांना 'धर्मभूषण', डॉ. संकेत चन्ने यांना 'व्यसनमुक्ती सेवारत्न', तर बेरी सांचीत यांना 'प्राणीमित्र सेवारत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दरम्यान प्रवचनात श्री श्री १००८ महामंडलेश्वर दत्तात्रेय महाराज दहिवाल यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि चमत्कारांचा दावा करणाऱ्या तथाकथित बाबांच्या आहारी जाऊ नये, असे आवाहन केले. अध्यात्म ाची कास धरून स्वतःचे जीवन कल्याणमय करण्याचा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. डॉ. शंकरराव धपाटे यांनी योग आणि मूलाधार चक्राचे महत्त्व विशद केले. तर नारायण अण्णा सुरगोणीवार यांनी भारतीय संस्कृतीतील गुरुपरंपरा आणि संस्कारांचे म हत्त्व अधोरेखित केले. पुरस्कार वितरणानंतर गुरुपूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199